# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक २१.०९.२०२६ सोमवार**

**नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा पदोन्ती समारंभ संपन्न :-**

नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणारे पोलीस ठाणे, वाहतुक, गुन्हेशाखा व इतर शाखांमध्ये कार्यरत असणारे एकुण ३५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांची कार्यालयीन पदोन्नती झाल्याने त्यांचा पदोन्नती सत्कार समारंभ आज दिनांक २१.०९.२०२६ रोजी पोलीस भवन येथील दालनात पार पडला.

पदोन्नती समारंभात पदोन्नती प्राप्त १४ सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक तथा २१ पोलीस हवालदार यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली असुन, त्यांना मा. पोलीस उपआयुक्त, मुख्यालय श्री. राहुल माकणीकर यांचे हस्ते तारा व फित लावण्यात आली तसेच, प्रशस्तीपत्र देऊन सर्वांचा गौरव करण्यात आला. मा. पोलीस उपआयुक्त, मुख्यालय यांनी पदोन्नती प्राप्त सर्व अधिकारी व अंमलदार यांनी आजपावेतो केलेल्या प्रामाणिक परिश्रम व निष्ठापुर्ण कर्तव्याची दखल घेऊन, सर्वांचे कौतुक केले व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमप्रसंगी सहायक पोलीस आयुक्त, मानव संसाधन विभाग, श्रीमती सुनिता मेश्राम तसेच, पदोन्नती प्राप्त अधिकारी व अंमलदार व त्यांचे परिवारातील सदस्य आणि ईतर पोलीस अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने हजर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तथा आभारप्रदर्शन सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती पुनम कोरडे यांनी केले.






(कामगिरी)

१) गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— अग्नी शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २१.०९.२०२६ रोजी, गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, पोहवा. रोशन तिवारी यांना त्यांचे खात्रीशीर गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती मिळाली की, अभिलेखावरील गुन्हेगार नामे योगेश यादवलाल सिरीया, वय २८ वर्षे, रा. गवळीपुरा, मोठी मस्जीद जवळ, सदर, नागपुर हा आपले लाल रंगाचे मोपेड क्र. एम.एच ३१ एफ.जे ६७४७ चे डिक्कीमध्ये अग्नीशस्त्र व काडतुस बाळगुन असुन, तो पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, आनंद झेरॉक्स सेंटर, धरमपेठ येथे वावरत आहे. आहे. अशा प्राप्त माहीतीवरून, नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता, प्राप्त वर्णनाचा आरोपी हा दिसुन आला. त्यास सापळा रचुन, ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे ताब्यातील मोपेडची झडती घेतली असता, डिक्कीमध्ये देशी बनावटीचे ०१ अग्नीशस्त्र, १४ जिवंत काडतुस, ०४ खाली मॅगझीन असा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीस मुद्देमालाबाबत विचारणा केली असता, त्याने त्याचा साथीदार आरोपी नामे अज्जु गाते, रा. गोंडवाना चौक, खदान वस्ती, सदर, नागपुर याचेकडुन विकत घेतल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन ०१ अग्नीशस्त्र व १४ जिवंत काडतुस, ०४ मॅगझीन, मोपेड वाहन व ०२ मोबाईल फोन असा एकुण किंमती अंदाजे २,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो पोलीस ठाणे जरीपटका येथे दाखल कलम ३,२५,५(१)(अ),२५(१)(अ),२७(१) भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. या गुन्ह्यामध्ये पाहीजे मुख्यआरोपी असल्याचे दिसुन आले.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र, मॅगझीन व काडतुस बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आरोपीविरूध्द कलम ३,२५, ५(१)(अ),२५(१)(अ),२७(१) भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव सिताबर्डी पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन, पोहवा. रोशन तिवारी, नितीन वर्मा, विलास कोकाटे, अजय शुक्ला, किशोर सोमकुंवर, पोअं. राहुल कुसरामे, मोअं. अभय ढोणे, विवेक कावडकर यांनी सायबर सेलचे पोउपनि. विवेक झिंगरे व त्यांचे पथकाचे विशेष सहाय्याने केली.





**२) सदर पोलीसांची कामगीरी :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांविरूध्द म.को.का. अंतर्गत कारवाई.**

दिनांक २०.०६.२०२६ रोंजी, आरोपी क्र. १) शकील खान वल्द अब्दुल गफ्फार खान, वय ४० वर्षे, २) सुजल जोसेफ पॉल, वय २० वर्षे, ३) साजीद शेख वल्द अब्दुल बासीत शेख, वय २६ वर्षे, ४) सलीम खान वल्द अब्दुल गफार खान, वय ४० वर्षे, ५) राजा खान वल्द अब्दुल गफार खान, वय ३० वर्षे, सर्व रा. गोवा कॉलोनी, संतोषी माता मंदीर जवळ, सदर, नागपुर यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी लक्की नरेश दासर, वय २४ वर्ष, रा. सुदर्शन दुर्गा माता मंदीर जवळ, गड्डीगोदाम, सदर, नागपुर यांना जिवे ठार मारण्याचे उद्येशाने हातबुक्कीने, लाकडी दांड्याने व चाकुने मारून गंभीर जखमी केले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे सदर येथे आरोपींविरूध्द कलम १०९, १८९(२), १८९(४), २९६, ११५(२) भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्यातील पाचही आरोपी हे टोळीचे सदस्य आहेत. ते कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, अश्लील शिवीगाळ करणे, मारहाण करणे, अवैध हत्यार बाळगणे असे शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरिकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे सदर पोलीसांनी आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायद्यान्वये प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. २, नागपुर शहर यांचेमार्फतीने सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा– १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मा. सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २) यांचे मार्गदर्शनाखाली, मा. श्री. शिवाजी गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग, पोलीस ठाणे सदर चे वपोनि. श्री. ज्ञानेश्वर भेदोडकर, पोनि. गुन्हे श्री. पवन भंगारदिवे, सपोनि. नरेंद्र तायडे, पोहवा. संजय यादव, रविशंकर, मिश्रा, प्रकाश बाळबुधे, सुनिल राऊत, विशाल नानोरकर, मपोअं. रजनी, व ममता यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २०.०९.२०२६ चे २०.५० वा. चे सुमारास, हुडकेश्वर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे हद्यीत, आऊटर रिंग रोड, खरसोली गावाकडे जाणाऱ्या हायवे रोडवरील बोगद्याजवळ एक इसम संशयीतरित्या फिरतांना दिसल्याने, त्यास थांबविले असता, तो पोलीसांना पाहून पळू लागला, त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंतरिक्ष संतोष मिश्रा वय २० वर्षे रा. प्लॉट क्र. १, बजरंग नगरी, नरसाळा रोड, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी धारदार चाकु लाल मुठ असलेला कि. २००/—रू. .चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने धारदार लोखंडी चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा बजरंग जुनघरे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन

पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि अमजद शेख यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे वाडी :— चोरी करणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी संजय बिपीन कामगौर वय ५३ वर्षे रा. हरहर अपार्टमेंट, गावंडे ले आऊट, अजनी, नागपुर हे डिफेन्स कपंनी अंबाझरी येथे इलेक्ट्रीक मेंटेनन्स विभागात काम करतात. दिनांक २०.०९.२०२६ चे ०१.१० ते ०७.३० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात आरोपीने कंपनीत ठेवलेले २४ कोर २.५ स्केअर एमएम इलेक्ट्रीक कॉपर वायर ८२ मीटर व १९ कोर २.५ स्केअर एमएम इलेक्ट्रीक कॉपर वायर २४ मीटर असा एकुण १,२२,५७८/— रु. चा मुद्येमाल चोरुन नेला. अशा फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि सतिश मेश्राम यांनी अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३०३(२) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**३) पोलीस ठाणे लकडगंज :— सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, आकाश बिल्डींग, प्लॉट क्र. ५०१, बाबा नानक शाळेजवळ, गरोबा मैदान येथे फिर्यादी श्रीमती ममता बबलु सहारे वय ४५ वर्ष व पती बबलु सहारे वय ५६ वर्ष तसेच त्यांचा मुलगा नामे तुषार बबलु सहारे वय २३ वर्षे असे सोबत राहतात. दिनांक १६.०९.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास फिर्यादीचे पती यांनी मुलाला घराकडे लक्ष देत जा, असे म्हणून इलेक्ट्रीक बिल व घरखर्चास पैसे देत नाही या कारणावरुन वादविवाद झाल्याने फिर्यादीचे पतीने दारुचे नशेत मुलाचा गळा दाबल्याने, अचानक झालेल्या झटापटीमध्ये मुलगा तुषार याने बाजुला असलेल्या पेचकसने फिर्यादीचे पतीचे पोटावर एक वार केल्याने ते जखमी होऊन रक्त निघाले. घराजवळील दवाखान्यात नेले असता, डॉक्टरांनी त्यांना चांगल्या दवाखान्यात नेण्यास सांगितले होते. दिनांक १७.०९.२०२६ रोजी नातेवाईकांनी त्यांना मेयो हॉस्पिटल येथे नेले व उपचार करुन घरी परत आणले होते. दिनांक १९.०९.२०२६ रोजी त्यांची प्रकृति खराब झाल्याने, नातेवाईकांनी त्यांना उपचाराकरीता तायवाडे हॉस्पिटल, शताब्दी चौक अजनी येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी १८.०० वा. मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी मुलगा तुषार हा मृतक पती यांचे मृत्युस कारणीभुत आहे अशा दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. सागर भंडारी ९४०४१०८१७५ यांनी आरोपीविरूध्द कलम १०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :—** फिर्यादी रजनिश श्रीबिजलाल पटेल वय २१ वर्ष रा. भिवसनखोरी, गौतम नगर, नागपूर यांचेकडे त्यांचे मावशीचा मुलगा नामे विवेक पटेल वय २१ वर्ष रा. हजारीपहाड, नागपूर हा दिनांक २०.०९.२०२६ चे रात्री २१.३० वा. त्याची पल्सर दुचाकी क्र. एमएच ३१ जीएफ ८६९६ घेऊन आला होता. फिर्यादी त्याचेसह गाडीवर मागे बसुन त्यांचा मित्र ओम याला भेटण्याकरीता त्याचे घरी जात असतांना, काटोल रोडकडून गिट्टीखदान चौकाकडे येतांना, हवेली हॉटेल समोर कोणीतरी त्यांना मागुन आवाज देत असल्याचा भास झाल्यामुळे दोघांनीही मागे वळून पाहिले असता, गाडी चालविणारा विवेक याचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने, त्यांची दुचाकी रोड डिव्हायडरला धडकल्याने फिर्यादी किरकोळ व विवेक याचे डोक्याला मार लागुन गंभीर जखमी झाला. जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी विवेक यास तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांचे बयाणावरुन पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. दीपक इंगळे यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे वाठोडा :–** दिनांक २०.०९.२०२६ चे २१.०० ते २१.०९.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, मानव नगर, हनुमान मंदीर, मतिमंद शाळेजवळील एका नवीन बांधकामाचे ठिकाणी असलेल्या सेफ्टी टॅंकचे पाण्यामध्ये श्रीमती सुनिता दुर्गेश वलुरकर वय ५० वर्षे रा. प्लॉट क्र. ७२, मानवनगर हनुमान मंदीर जवळ, वाठोडा, नागपूर यांचा मृतदेह मिळून आला. लोकांचे मदतीने मृतदेह बाहेर काढून पुढील कार्यवाहीस्तव मेडीकल हॉस्पिटल येथे पाठविण्यात आलेला आहे. मृतक यांचे नातेवाईकांनी त्यांची ओळख पटविली.

याप्रकरणी फिर्यादी राहुल दुर्गेश वलुरकर वय २० वर्षे रा. प्लॉट क्र. ७२, मानवनगर, वाठोडा, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि जैद मोमीन यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**